# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/C 74986 दिनांक : 20/08/2019

## परिपत्रक

**विषय : -प्राधान्य सदराखाली भूखंड वाटप केलेल्या मेगा व अल्ट्रा मेगा प्रकल्पांच्या Vendors कंपन्यांना प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबत.**

**संदर्भ :- १.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/३३२२/२०१२ दिनांक १९.१२.२०१२.**

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात विविध प्रयोजनांसाठी प्राधान्य सदराखाली भूखंड वाटप करण्यात येतात. मेगा प्रकल्पासाठी भूखंड वाटप केलेल्या कंपन्यांना त्यांचे मुख्य उत्पादन करत असताना विविध आनुषंगीक उप-उत्पादने पुरवणा-या विक्रेत्यांची अनिवार्य गरज असते. अशा अन्य पुरवठादार कंपन्यांकडून (Vendors) तयार झालेल्या उत्पादनावर मेगा प्रकल्प कंपन्या त्यांच्या उप-उत्पादनासाठी अवलंबून असतात. अशा पुरवठादार कंपन्यांकडून (Vendors) प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने तसेच त्यांचा उत्पादनाचा दर्जा वाढवून त्यांना अधिक स्पर्धात्मक बनविण्यासाठी आणि औद्योगिक क्षेत्रातील प्राधान्याने भुखंड वाटप केलेल्या मूळ प्रतिष्ठीत उद्योजकास पुरेपूर सहाय्य व्हावे, या उद्देशाने अशा पुरवठादार कंपन्यांना (Vendors) प्राधान्याने भूखंड वाटप करणे आवश्यक असल्याने याबाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक २८.१२.२०१८ रोजी झालेल्या ३७८ व्या बैठकीत चर्चा होवून ठराव क्र. ५८२६ पारीत करण्यात आला.

तदनंतर महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्राच्या भविष्यासाठी नवीन औद्योगिक धोरण-२०१९ जाहिर केले असून सदरहू औद्योगिक धोरणातील अ.क. १०.२ नुसार , मेगा व अल्ट्रा मेगा प्रकल्पाकरीता प्रभाग निहाय्य व क्षेत्र निहाय्य कमीत कमी गुंतवणूक सुधारित करण्यात आली आहे. सदरहू नवीन औद्योगिक धोरणामधील मेगा व अल्ट्रा मेगा प्रकल्प कंपनीच्या( Anchor unit) अर्हतेच्या सुधारणेनुसार ठराव क्र. ५८२६ मधील अ.क्र. १ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्तावाबाबत संचालक मंडळाच्या दिनांक २०.०६.२०१९ रोजी झालेल्या ३८१ व्या बैठकीत चर्चा होवून ठराव क्र. ५९२६ पारीत करण्यात आला.

सदरहू ठरावानुसार महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात दिनांक १९.१२.२०१२ रोजीच्या परिपत्रकानुसार प्राधान्य सदराखाली वाटप करण्यात येत असलेल्या मेगा व अल्ट्रा मेगा प्रकल्पांत Anchor Unit म्हणून निर्धारित होणा-या कंपन्यांना आनुषंगिक उप-उत्पादने पुरवण्यासाठी त्यांचेशी नोंदणीकृत झालेल्या पुरवठादार कंपन्यांना (Vendors) खालील अटी व शर्तीवर प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात यावे.

१. मेगा प्रकल्प अथवा अल्ट्रा मेगा प्रकल्प कंपनीने खालीलप्रमाणे गुंतवणूक केली आहे, अशा कंपनीला Anchor unit म्हणावे.



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| अ.क्र. | प्रभाग(zone) व क्षेत्र वर्गीकरण | कमीत कमी गुंतवणूक (रु. कोटी मध्ये) |
|---|---|---|
| **अ)** | **मेगा प्रकल्प** | |
| १ | अ व ब | १५०० |
| २ | क | १००० |
| ३ | ड | ७५० |
| ४ | ड+ | ५०० |
| ५ | विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व धुळे | ३५० |
| **ब)** | **अल्ट्रा मेगा** | |
| | संपूर्ण राज्य(Entire state) | ४००० |

२. सदर मूळ कंपन्यांनी पुरवठादार कंपन्यांना (Vendor) भूखंड मिळण्याकरीता शिफारस केली असणे आवश्यक आहे व अशा मूळ कंपनीने पुरवठादार कंपन्यांना (Vendor), कंपनीची त्याच औद्योगिक क्षेत्रातील त्यांच्या युनिटसाठीची अनिवार्यता प्रमाणित करणे आवश्यक आहे. अर्ज करताना, अर्जदाराने तो मूळ कंपनीचा पुरवठादार कंपन्यांना (Vendor) असल्याबाबत मूळ कंपनीकडून प्रमाणपत्र, तसेच उत्पादित मालासाठी प्राप्त झालेल्या मागणीपत्राच्या व २ कंपन्यातील ५ वर्षासाठीचा करार झाल्याच्या प्रमाणित प्रती तसेच Orders in hand सादर करणे आवश्यक आहे. तसेच मूळ कंपन्यांनी स्थानिक पुरवठादार कंपन्यांना अग्रक्रम देणे बंधनकारक आहे आणि अशी अट मूळ कंपनीच्या करारनाम्यात नमूद करण्यात यावी. या संदर्भात सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास, तशी कागदपत्रे सादर करण्या-या कंपनीचे भूखंड वाटप रद्द करण्यात येऊन खोटी माहिती सादर केल्याबाबत योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

३. प्राधान्य सदराखाली भूखंडाचे वाटप करण्यासाठी पुरवठादार कंपन्यांना (Vendor) सविस्तर प्रकल्प अहवाल व आवश्यक ती अन्य सर्व कागदपत्रे/ दस्तऐवज, शासकीय परवाने इत्यादि संबंधित भूखंड वाटप समिती समोर सादर करावीत.

४. पुरवठादार कंपन्यांना (Vendor) अशा प्राधान्य सदराखालील भुखंड वाटपासाठी २ वर्षाच्या कालावधीत खालीलप्रमाणे गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रभाग(zone) | कमीत कमी गुंतवणूक (रु. कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १ | अ व ब | १०० कोटी |
| २ | क | ५० कोटी |
| ३ | ड व ड+ | २० कोटी |

५. अशा कंपन्यांना, मूळ Anchor कंपनीच्या वाटप क्षेत्राच्या १०% हून अधिक क्षेत्राचे वाटप करण्यात येवू नये. अशा उद्योजकांच्या प्रकल्पामधील भूखंड क्षेत्राबाबत व गुंतवणूकीबाबत महामंडळाचे तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय घेवून त्यानुसार क्षेत्र वाटपाबाबत निर्णय घेण्यात यावा. १०% हून अधिक क्षेत्रासाठी वाटप करावयाचे झाल्यास मु.का.अ. यांची पूर्वमान्यता घेण्यात यावी.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

६. अशाप्रकारे वाटप केलेल्या भूखंडाचे हस्तांतर ५ वर्षे करता येणार नाही, मात्र अपवादात्मक परिस्थितीत सबळ कारणासह ५०% फरकाची रक्कम हस्तांतरण शुल्क म्हणून भरुन घेतल्यास ५ वर्षाच्या आत हस्तांतर मंजूर करावयाचे अधिकार मु.का.अ. यांना असतील.

७. ज्या प्रयोजनासाठी भूखंड वाटप करण्यात आलेला आहे, त्या प्रयोजनासाठीच महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार भूखंड हस्तांतर करता येईल.

८. वाटप केलेल्या भूखंडावर वाटपापासून ५ वर्षापर्यंत पोटभाडयास परवानगी देण्यात येणार नाही.

९. भूखंड वाटप करण्याचे अधिकार सह मु.का.अ. यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समितीस राहतील.

१०. अशा वाटप प्रकरणांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

११. प्राधान्याने भूखंड वाटप करणेसाठी, ज्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटप सरळ पध्दतीने करण्यात येते, त्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडांचे वाटप औद्योगिक दर + रोड विड्थ चार्जेस(लागू असल्यास) अशा येणा-या दराने करण्यात यावे आणि ज्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडांचे वाटप जाहीर निविदा पध्दतीने करण्यात येते, त्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडांचे वाटप औद्योगिक दर + १० टक्के अतिरिक्त दर + रोड विड्थ चार्जेस(लागू असल्यास) अशा येणा-या दराने करण्यात यावे.

१२. प्राधान्याने वाटप केलेल्या भूखंडाच्या विकासाचा कालावधी प्रभाग(Zone) विचारात न घेता सरसकट दोन वर्षाचा राहील (भूखंडाचा ताबा दिल्याचा दिनांक अथवा करारनामा केल्याचा दिनांक यापैकी जो दिनांक अगोदरचा असेल तो ग्राहय धरण्यात यावा.)

१३. उपरोक्त प्रमाणे उद्योजकांना वितरित केल्या जाणा-या भूखंडांना प्राधान्य सदराखाली प्रचलित धोरणाप्रमाणे लागू असलेल्या मुदतवाढी, अधिकार कक्षेनुसार सक्षम अधिका-यांच्या मान्यतेने अनुज्ञेय राहतील.

सदरहू धोरण या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहिल. सर्व संबंधितांनी सदर सुधारित धोरणाची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,
१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in